प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत असलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मानधनात सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०२१/प्र.क्र.९३/योजना-१०
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
तारीख: १९ ऑक्टोबर, २०२३.

वाचा :- १. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३९/यो-१०, दि.२७.०५.२०१६.
२. ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.पीएमएवाय-जी-२०१८/प्र.क्र.२४५/योजना-१०, दि.२५.०९.२०१८.
३. ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्र. बामयं/प्र.क्र.३३/वित्त-९, दि.२६.०८.२०२०.
४.ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र: प्रआयो/प्र.क्र.९३/योजना-१०, दि.१२.११.२०२१.
५.ग्रामविकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्र: प्रआयो/प्र.क्र.९३/योजना-१०, दि.०९.१२.२०२१.

प्रस्तावना :-

राज्यातील विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांची पाहणी करणे व योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे याकरिता संदर्भ क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये, १६०० ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांची पदे Performance Based पद्धतीने बाह्ययंत्रणेद्वारे भरण्याकरिता मान्यता देण्यात आली. सन २०१६-१७ ते सन २०२०-२१ या कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची Performance Based पद्धतीने बाह्ययंत्रणेद्वारे जिल्हास्तरावरून आवश्यकतेनुसार नियुक्ती करण्यात आली. तद्नंतर, ग्रामविकास विभाग अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व कार्यालयांतील बाह्य यंत्रणेद्वारे/ कंत्राटी स्वरूपात कार्यरत असणारे कर्मचारी यांची नियुक्ती CSC-SPV या संस्थेमार्फत करणेबाबत सूचना संदर्भीय शासन निर्णय क्र.३ अन्वये देण्यात आल्या. दिनांक १ एप्रिल, २०२१ पासून राज्यातील कार्यरत Performance Based ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे मानधन

(कृ.मा.प.)

अदायगी CSC-SPV या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णय दि. १२.११.२०२१ अन्वये, डोंगराळ, दुर्गम व नक्षलग्रस्त भागासाठी रु.१०००/- प्रति घरकुल वरुन रुपये १२००/- प्रति घरकुल तसेच इतर सर्वसाधारण भागासाठी रु.७५०/- वरून रुपये ९५०/- प्रति घरकुल इतकी मानधन वाढ देण्याबाबत निर्णय घेतला. तसेच, संदर्भ क्र.५ येथील शासन शुध्दीपत्रक दि.०९.१२.२०२१ अन्वये, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना देय मानधन यापुढे ३ टप्प्यामध्ये आवास सॉफ्ट प्रणाली अहवालाच्या आधारे अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्यामार्फत प्रामुख्याने लाभार्थ्यांना बांधकाम विषयक मार्गदर्शन करणे, टप्पानिहाय बांधकामाचा फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड करणे व घरकुलाच्या बांधकामा संदर्भात लाभार्थ्यांचा पाठपुरावा करणे इ. कामे केली जातात. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची नियुक्ती Performance based वर असल्याने त्यांना त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे मानधन मिळते. केंद्र शासनाच्या “सर्वांसाठी घरे २०२४” च्या धोरणानुसार राज्यातील सर्व प्रगतीपथावरील घरकुले मार्च, २०२४ पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. त्यामुळे राज्यात ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाची अंमलबजावणी मिशन मोडवर करण्यात येत आहे. राज्यातील सर्व घरकुले विहित कालावधीत पूर्ण करणे अपेक्षित आहे. ही बाब विचारात घेता, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मानधनात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मानधनामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | कामाचा टप्पा | सर्वसाधारण भाग | डोंगराळ व दुर्गम भाग |
|---|---|---|---|
| १. | जोत्या पर्यंत पूर्ण (Plinth) | रु.३८०/- | रु.४८०/- |
| २. | छज्या पर्यंत पूर्ण (Lintel) | रु.३८०/- | रु.४८०/- |
| ३. | शौचालयासह काम पूर्ण व अंतिम दाखला देणे | रु.३८०/- | रु.४८०/- |
| | **एकूण-** | **रु.११४०/-** | **रु.१४४०/-** |

२. सदर कर्मचाऱ्यांच्या मानधनातील सुधारणांमुळे उद्भवणारा खर्च केंद्र शासन पुरस्कृत तसेच राज्य शासन पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या प्रशासकीय खर्चाच्या निधीमधून भागविण्यात यावा.

३. तसेच, ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना यापुढे मानधन वाढ द्यावयाची झाल्यास संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांनी त्यांचा Performance विचारांत घेऊन त्यांनी केलेल्या घरकुलाच्या कामाच्या आधारे प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक राहिल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२३१०१९१६२८१७९४२० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

KALU GONYA VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C5D0F275C3D9A21DB07FECF7919C2D83796E88930D62D44E7A4A6D4CBEE7E0E, cn=KALU GONYA VALVI
Date: 2023.10.20 15:12:36 +05'30'

(का.गो.वळवी)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
३. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव व प्रधान सचिव.
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
६. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/ विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव.
८. मा. सर्व पालकमंत्री तथा मंत्री यांचे खाजगी सचिव.
९. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय.
१२. सर्व जिल्हाधिकारी.

१३. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, मुंबई.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई.
१६. सर्व कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१७. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय.
१८. अवर सचिव, योजना- १०, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
१९. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती.
२०. सर्व सरपंच, ग्रामपंचायत.
२१. निवड नस्ती.